MHSO110002342024

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ८७/२०२४</u>**

रवींद्रकुमार व्होरा विरुध्द रवींद्र बु-हाडे

**<u>निशाणी क्र. २७ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रतिदाव्यातील वादी क्र. ०१ रविंद्र सुर्यकांत बु-हाडे यांचे वारस रेकॉर्डवर घेवून त्याकामी प्रतिदाव्यात दुरुस्ती होवून मिळणबाबत सदरहु अर्ज केलेला आहे.

०२. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हद्दीखुणा कायम होणेकामी तसेच निरंतर ताकीदीसाठी केला आहे. प्रतिदाव्यातील वादी क्र. ०१ रविंद्र सुर्यकांत बु-हाडे हे दिनांक ३१.०५.२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिदाव्यातील वादी यांना छाया, चेतन व विक्रम हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे प्रतिदाव्याच्या सरनाम्यात वादी क्र १अ छाया रविंद्र बु-हाडे, वादी क्र १ब चेतन रविंद्र बु-हाडे तसेच वादी क्र १क विक्रम रविंद्र बु-हाडे अशी दुरुस्ती होवून मिळणबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास विरोध करत योग्य तो आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

०४. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हद्दीखुणा कायम होणेकामी तसेच निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. अर्जाचे स्वरूप पाहता प्रतिदाव्यातील वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिदाव्यातील वादी क्र.१ च्या वारसांना दाव्याकामी सामील करण्यासाठी व दुरुस्ती करणेकामी दिलेला आहे. सदयस्थितीत त्याचा कोणताही तोटा प्रतिदाव्यातील प्रतिवादींना संभवत नाही. किंबहुना प्रतिदाव्यातील वादी क्र.१ चे वारस दाव्याकामी घेणे व त्या अनुषंगाने प्रतिदाव्यात दुरुस्ती करणे हे प्रतिदाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक बाब

आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे

**आदेश**

१. सदरहु अर्ज निशाणी क्र. २७ हा मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जात उल्लेखीत केलेनुसार मयत प्रतिदाव्यातील वादी क्र. ०१ रविंद्र सुर्यकांत बु-हाडे यांचे वारस प्रतिदाव्यामध्ये दुरूस्ती करून सामील करावेत तसेच दुरूस्त दाव्याची प्रत या आदेशापासुन १४ दिवसांत अभिलेखावर दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.13 17:48:56 +0530

(आर. डी. शिंदे)

दिनांक १३.०८.२०२६

४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | $4^{th}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 13 / 08 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 13 / 08 / 2026. |

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | $4^{th}$ Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 13 / 08 / 2026. |
| **Order uploaded on** | **:** | 13 / 08 / 2026. |